# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४३२/२०२३ दिनांक – १८/१२/२०२३

## भारतामध्ये अवैध पणे वास्तव्य करणा-या चार बांगलादेशी आरोपीतांवर कारवाई करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश

दि.१६/१२/२०२३ रोजी ०६.०० वा. सुमारास **तुळींज** पोलीस ठाण्याचे हद्दीत रुम नं. शिवराज मन्नत अपार्टमेंट प्रगतीनगर नालासोपारा पुर्व येथे गेलो असता सदर चाळीतील १०६ व रुम नं.२०४ येथे बांग्लादेशी नागरीक अवैधरित्या भारतामध्ये वास्तव करुन राहत आहेत अशी अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना त्यांचे खास बातमिदारामार्फत माहीती मिळाली. त्यावर शिवराज मन्नत अपा. प्रगतीनगर नालासोपारा पुर्व येथे छापा टाकुन रुम नं.१०६ व रुम नं.२०४ मधील चार बांग्लादेशी आरोपीतांवर कारवाई करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश मिळाले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, शिवराज मन्नत अपार्टमेंट प्रगतीनगर नालासोपारा पुर्व येथे रुम नं.१०६ व २०४ मध्ये अवैधरित्या बांग्लादेशी नागरीक राहत असलेबाबत माहीती मिळाल्यावरुन सदर बातमीची शहानिशा करुन वरील पत्त्यावर जावुन रुम नं.१०६ मध्ये गेलो असता तेथे जावुन सदर रुममधील इसमांना त्याचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) मन्सुर हानिम मुल्ला वय- ६१ वर्ष २) सदाम मन्सुर मुल्ला वय- २८ वर्ष. ३) बसर मन्सुर मुल्ला वय- ४२ वर्ष. सर्व रा.रुम नं-१०६ शिवराज मन्नत अपा.प्रगती नगर नालासोपारा पुर्व मुळ रा.ग्राम संदरपुर देश बांग्लादेश मो-९५११६८२२२८ असे सांगितले. तसेच रुम नं २०४ मधील एक पुरुष नामे ४) शोभुज रोबीउल शेख वय-२७ वर्ष असे चार इसम मिळुन आले असता त्यांना त्यांचे भारतीय नागरीकत्वाचे कागदपत्र सादर करण्यास सांगितले असता त्यांनी त्याचे कोणतेच कागदपत्र सादर केले नसुन ते मुळ बांग्लादेशी देशाचे असल्याचे त्यांनी सांगितले. वरील सर्व आरोपी हे बांग्लादेश या देशाचे नागरीक असुन ते अनैधिकृतपणे पश्चिम बंगाल मार्गे भारतात आलेले असल्याचे त्यांनी सांगितले वरुन सदर आरोपींच्या विरुध्द तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ८८५/२०२३ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९२० चे कलम ३(अ),६(अ),सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री मदन बल्लाल यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पो.नि. संतोष चौधरी, पो.हवा. शेटये, शिंदे, म.पो.हवा. डोईफोडे, पाटील, चा.पो.हवा. पागी, सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी केली आहे.